# मेट्रो ३ : दक्षिण मुंबईतील कामकाज होणार वेगात

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान काळबादेवी गिरगाव येथील प्रकल्पबाधित भाडेकरूंनी आपल्या इमारती रिक्त केली आहे. त्यामुळे आता दक्षिण मुंबईतील कामकाजाला वेग मिळणार आहे.

मेट्रो ३ साठी काळबादेवी गिरगाव येथील ३० इमारतींत ३४३४ भाडेकरू प्रकल्पबाधित म्हणून एमएमआरसीएलकडून जाहीर करण्यात आले होते. काळाबादेवी आणि गिरगाव या दोन भूमिगत स्थानकांचे काम जोरात सुरू असून या महिन्यात एमएमआरसी खोदकाम सुरू करणार आहे. ७३४ भाडेकरूपैकी ४४७ निवासी व २८७ व्यावसायिक भाडेकरू आहेत. एमएमआरसीने ८६ भाडेकरूंना गिरगावातील पिंपळवाडी येथे स्थलांतरित केले असून उर्वरित एमएमआरसी निवासी भाडेकरूंना ३० हजार आणि व्यावसायिक घटकांना ४२ हजार मासिक भाडे दिले आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या संपूर्ण भुयारी मार्गिकेदरम्यान ३१ किमी बोगद्याचे काम पूर्ण केले असून ३२ पैकी १५ बोगद्यांचे काम पूर्ण करण्यात आले आहे. स्थानिकांनी ५०० मीटरच्या परिघात स्थानांतर हवे असल्याची मागणी केली होती. त्यानुसार गिरगाव आणि काळबादेवी येथील ५०० मीटरच्या परिघातच स्थानांतरित करण्याच्या मागणीस एमएमआरडीएने मान्यता दिली आहे. मराठी आणि गुजराती परिसरातील या विभागात एमएमआरसीला १० हजार चौरस मीटर भूखंड आवश्यक आहे. या प्रकल्पाला स्थानिकांनी विरोध दर्शवला होता. मात्र चर्चा करून विविध अडचणींवर मात करत रहिवाशांच्या सकारात्मक निर्णयाकडे कूच केली आहे.

विस्थापित रहिवाशांचे २०२१ पर्यंत एकाच ठिकाणी काळबादेवी कमर्शिअल सेंटर, काळबादेवी हाईट्स आणि गिरगाव हाईट्स या तीन इमारतींमध्ये पुनर्वसन होणार आहे. काळबादेवी हाईटससाठी निविदा काढल्या असून निवडणुकांपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.